धर्म संस्थापनार्थाय अखिल युद्धाय कृतनिश्चयः

धर्मराज्य पक्ष

अध्यक्ष
राजन राजे

संदर्भ क्र.________ दिनांक : १६/०७/२०१४

# कापुरबावडी उड्डाणपूल त्वरित सुरू करा – नितीन देशपांडे

**प्रतिनिधी,**

दि. १६ – कापुरबावडी उड्डाणपूलाची दुसरी मार्गिका त्वरित सुरू करा अशी मागणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडे धर्मराज्य पक्षाचे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी केली आहे.

घोडबंदर रोडवरील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी बांधण्यात येणाऱ्या कापुरबावडी उड्डाणपूलाच्या दुसऱ्या मार्गिकेचे काम अत्यंत धीम्यागतीने सुरू आहे. हा पूल राज्य शासन बांधत असून ठेकेदारांच्या दिरंगाईने हा पूल रखडलेला आहे. पण यामुळे घोडबंदरकडे, भिवंडीकडे आणि मुंबईकडे जाणाऱ्या वाहनांचा खोळंबा होत आहे. खासकरून पावसाळ्यात तर वाहतुकीची प्रचंड कोंडी होताना दिसत आहे. सदर पूल डिसेंबर २०१३ पर्यंत पूर्ण होऊन वाहतुकीस खुले होईल, असे कापुरबावडी पूलाच्या एका मार्गिकेच्या उद्घाटन प्रसंगी आपण सांगितले होते. प्रत्यक्षात जुलै २०१४ चा अर्धा महिना उजाडला तरी काम पूर्ण झालेले नाही, तरी कापुरबावडी उडडाणपूलाची दुसरी मार्गिका त्वरित सुरू करून होणाऱ्या त्रासापासून ठाणेकर जनतेची सुटका करावी, असे निवेदन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडे धर्मराज्य पक्षाचे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी दिले आहे.

–––– ### ––––

ए/एर०३, 'पांचजन्य'-२, रिगलप्लाझा-लोकपुरम प्रिमायसेस् को.ऑ.हौ. सोसायटी, ग्लॅडीज् अल्वारिस मार्ग, पोखरण रोड नं.२, ठाणे (प.)-४०० ६१०, दूरध्वनी : २१७१ ६७२१ / ८१०८१ २५०००

७/६०१-६०२, 'पांचजन्य', शुभारंभ, फेज-१, कोकणी पाडा मार्ग, द्वारा-घोडबंदर रोड, मानपाडा, ठाणे (प.)-४०० ६१०. दूरध्वनी : ६५२७ ०००१ / २७७९ ०६७००

*"सर्व सामान्यांचं जीवन-मरण आणि पर्यावरण, हवं एवढ्यासाठीच राजकारण!"...*